# संत ज्ञानेश्वरांच्या स्फूट कवितेतील परमात्म रूपाचे वर्णन

**डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे**
मराठी विभाग प्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव

ज्ञानेश्वरांच्या अभंग साहित्यातील गवळणी व विरहिणी हा एक अतिशय उत्कृष्ट कविता प्रकार आहे. गवळणीत एका स्त्रीची भूमिका असते विशेषत: श्रीकृष्णाच्या प्रेमात पडलेल्या गवळणीची भूमिका अशा कवितेत असते. श्रीकृष्ण कथेत गोपीचे श्रीकृष्णावरील प्रेम अनन्यसाधारण होते. गोकुळातील गोपींना स्वत:चा संसार होता पण या गोपी स्वत:चा संसार, घरदार, पती, मुलेबाळे, गाई-वासरे, मान, प्रतिष्ठा, लज्जा सोडून श्रीकृष्णाच्या प्रेमात पडल्या. श्रीकृष्णाच्या रूपाने त्या मोहित झाल्या. श्रीकृष्णाच्या सौंदर्याने त्यांना वेडे केले. श्रीकृष्णाच्या गुणांनी त्यांचे मन वेधून घेतले. श्रीकृष्णाने गोपींना आपले सर्वस्व दिले. गोपींचा हा प्रेमभाव मराठी संतांनी आपल्या काव्यात आणला त्यास गवळणी म्हणतात. आत्मरूपाने व शरीराने गवळणी कृष्णाशी एकरूप झाल्या. त्याच्या भेटीसाठी त्यांचे मन तळमळले. हा भाव संतांनी ज्या कवितेत व्यक्त केला त्यास विरहिणी म्हणतात. श्रीमद्भागवतात गोपींच्या श्रीकृष्णप्रेमाचे उत्कट वर्णने आली आहेत. गोपींचा प्रेमभाव म्हणजे कामभावना नव्हे, कारण काम भावनेत शारीरिक वासनांच्या तृप्तीचा संबंध असतो. येथे गोपी श्रीकृष्णाशी एकरूप झाल्या आहेत. ती एकरूपता शरीराची/मनाची नसून आत्मभावाची एकरूपता आहे. येथील मिलन म्हणजे आत्म्याचे परमात्म्याशी होणारे मिलन आहे. हीच भावना संतांच्या गवळणीत आढळते. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, निळोबा या सर्व संतांच्या साहित्यात गवळणी हा प्रकार आढळतो. नामदेवांच्या गवळणीत कृष्णाच्या खोडकर स्वभावाचे चित्रण आले आहे तर नाथांच्या गवळणीत शृंगार व हास्यरस आहे. तुकोबांच्या गवळणीत कृष्ण कथेतील अनेक प्रसंगाचे चित्रण आले आहे. तुकोबांच्या विराण्यात व्याभिचारी भाव रांगड्या शब्दात वर्णन केला आहे, तर निळोबांच्या गवळणी आत्मानुभवात रंगल्या आहेत. तथापि ज्ञानदेवांच्या गवळणी सर्व संतांच्या गवळणीत आपला वेगळेपणा सिद्ध करतात.

ज्ञानदेवांच्या गवळणीत प्रामुख्याने श्रीकृष्णासी समरस झाल्याचा भाव व्यक्त झाला आहे श्रीकृष्णाचा रंग निळा, सावळा त्या सावळ्या कृष्णाच्या रूपाशी तन्मय झालेल्या एका गोपीला ती रात्र निळ्या रंगाची वाटते या निळया रंगाच्या रात्री ते यमुनेचे पाणी जणू काही मोत्याप्रमाणे चमकत आहे. निसर्गात जिकडे पहावे तिकडे निळ्या रंगाची जणू काही उधळण होत आहे. आतापर्यंत ज्या प्रकारची संसारातील दु:खाची अनुभूती होती ती संपून गेली आहे आणि सगळ्या जीवनाला अमृताची कळा प्राप्त झाली आहे. जणू काही सावळ्या रंगातून, मेघातून आनंदाची सारखी वृष्टी होत आहे असे त्या गोपीस वाटते. अभंगात जणू काही सर्वत्र चिंतामणी दिसू लागते. थोड्या वेळाने ती गोपी फुलांच्या शय्येवर विराजमान होते आणि कृष्णाचा हलकासा स्पर्श तिला होऊ लागतो. कृष्णाने आपले मुख कमल आपल्या मुख कमलावर टेकले आहे, आपण आपले डोळे भरून त्या निळया सावळ्या कृष्णमूर्तीला पहात आहोत भोवताली कमळाच्या फुलांचा सुगंध दरवळत आहे, चंदनाच्या ओटीने तिला धुंद केले आहे, अनेक प्रकारची दिव्य पक्वान्ने भोजनाला सजवून ठेवली आहेत. एवढ्या तो मघाचा श्रीकृष्ण कुठे गेला तेच तिला समजत नाही खरे म्हणजे तो आलाच नव्हता तिला कृष्ण आल्याचा भास होत होता. अशी ती विरहिणी कृष्णाची वाट पाहत आहे तिचे मन कृष्णाच्या निळ्या, सावळ्या रंगात धुंद झाले आहे. ज्ञानदेव वर्णन करतात, "मन तो निळिये गोविंदाचिये सोसे । विरहिणी पाहे वाटुली ऐसी । ज्ञानदेवी निळिये वाटुली गोविंदी । कृष्ण निळिये

पदी तव जाला ॥" अशा शब्दात ज्ञानदेवांनी गोपीची सर्व समर्पणशीलता व्यक्त केली आहे. कृष्णाच्या वाटेकडे डोळे लावून प्रदीर्घ प्रतिक्षा करणारी ती गवळण कृष्णाची वाटुली बनली आहे. निळ्या रंगाच्या वाटेकडे डोळे लावून बसलेली ही गोपी आता निळी वाट बनली आहे. अशा प्रकारे ज्ञानदेवांची गवळण प्रतीक्षेत इतकी हरवून जाते की, तिला कृष्णापेक्षा निराळेपणा वाटत नाही.

ज्ञानदेवांच्या विरहिणीत अतिशय गोड पार्श्वभूमी आहे. मेघाचा घुणूघुणू आवाज होत असतो. वाऱ्याच्या झुणझुणु वाहण्याने आणि त्या मेघांच्या गर्जनाने विरहिणीस एकदम कृष्णाची आठवण येते व ती आपल्या सख्यांना भेट म्हणून द्यावी अशी इच्छा व्यक्त करते. सावळ्या मेघाचे दर्शन होताच त्या गवळणीस सावळ्या कृष्णाची आठवण व्हावी हा योगायोग अतिशय सुंदर वाटतो. श्रीकृष्णाच्या विरहात असलेल्या गोपीस चंद्राचे चांदणे आवडत नाही, चाफ्याचा सुगंध श्रीकृष्णावाचून तिला नकोसा वाटतो. त्या विरहिणीस विरहाचे दुःख होऊ नये म्हणून तिच्या सख्यांनी तिच्या सर्वांगास चंदनाचा लेप दिला पण ते चंदनही तिला पोळू लागते "चंदनाची चोळी माझे सर्व अंग पोळी । कान्हो वनमाळी वेगी भेटावा का ॥" श्रीकृष्णाच्या भेटीचा ध्यास त्या विरहिणीस लागलेला असतो. तिच्या सख्यांनी तिला फुलाच्या शय्येवर झोपवले पण ती शय्या तिला अग्नीप्रमाणे पोळत होती. कोकिळेचे भजन किती मधुर पण तेही तिला मानवत नव्हते. आपल्या मैत्रिणींना ती म्हणाली हे संगीत बंद करा कोकिळेला हाकलून लावा फुलांची शय्या विझवून टाका फक्त श्रीकृष्णाची भेट करवा अशी ही विरहमग्न गोपी शेवटी आरशात आपले रूप पाहते. पण आरशात तिला आपले रूप दिसत नाही तर आरशात तिला श्रीकृष्णच दिसतो. श्रीकृष्णाने हे कसे नवल केले याबद्दल ती स्वतः अचंबित होते. ज्ञानदेवांच्या विरहिणीत अभेदाची अनुभूती असली तरी त्यातील श्रृंगार राजविलासी असतो. ज्ञानेश्वरांच्या विरहणीचे नाते महानुभाव कवी नरेंद्राच्या रुक्मिणीशी सहजपणे जुळते. कारण नरेंद्राने देखील विरहीणी रुक्मिणीचे शब्दचित्र अगदी याच पद्धतीने रेखाटले आहे. विरहिणीच्या सख्या यांनी विरहीणीच्या वीरहाचे दुःख कमी व्हावे म्हणून केलेले राजोपचार ही पार्श्वभूमी नरेंद्राच्या काव्याप्रमाणेच ज्ञानेश्वरांच्या गीतातही आढळते. आणखी एका गीतात एक विरहिणी श्रीकृष्ण म्हणजेच पंढरीचा राणा विठ्ठल यांच्या भेटीसाठी अतुर झाली आहे. तो आवडता केव्हा येईल या विवंचनेत ती असते एवढ्यात एक कावळा नव्हे काऊ, काऊ करू लागतो. असा कावळा काव, काव करू लागला की, आपण आपल्या मनातील गोष्ट होईल की नाही असे मनातच म्हणायचे आणि त्याचक्षणी कावळ्याने कावकाव केलेली मनातील गोष्ट नक्कीच होणार असा लोकसंख्येत आहे. कावळ्याने हा शकुन सांगावा अशी त्याची इच्छा आहे. त्या विरहिणीचा काऊशी तिचा संवाद सुरू होतो. त्याने आपल्या मनातील शकुन सांगावे. ती त्या काऊचे पाय सोन्याने मढविणार असते त्याच्यावर वीरहीणीचे जिवापाड प्रेम आहे. तो विठ्ठल येण्याची खूण सांगतात ती त्या काऊला दहीभाताचा खाऊ देणार आहे. पण त्याने एकदा तरी विठ्ठल केव्हा येणार आहे हे सांगावे. ते सांगताच त्याने अंगणातील आंब्याच्या झाडाची रसाळ आंबे खुशाल खावेत. पण त्याने पंढरीनाथ केव्हा येणार आहे हे सांगावे. याही गीतात ज्ञानदेवांची नायीका राजविलासी विरहीणीही दाखविली आहे. एरवी कावळा या शब्दामागे असलेला अभद्र संदर्भ कवीने येथे काऊ या शब्दाने दूर केला आहे. काऊ या शब्दातच किती लाडिवाळपणा आहे. कावळ्याच्या पायात कुणी सोन्याचे वाळे घालत नाही व त्याच्यासाठी कोणी दुधाची वाटी देत नसतो पण या विरहिरीणीचा विठ्ठल तिच्या भेटीस लवकरात लवकर यावा म्हणून ती विरहिणी हे सर्व करण्यास तयार आहे. या गीतातील एकूणच वातावरण नाट्यपूर्ण व खेळकर आहे.

ज्ञानदेवांच्या काही गीतात श्रीकृष्ण कथेचा संदर्भ आहे. अशा गवळणीत ज्ञानदेव कृष्णाच्या रूप गुणाशी तादात्म्य पावले आहे. गवळणीचे चित्र रेखाटताना उदाहरणार्थ गीतात गोकुळातील गवळण दहया दुधाच्या घागरी एकावर एक ठेवून ती मथुरेच्या बाजारात निघाली आहे. बाजारातून येऊन ती दही दुधाच्या वाट्या घ्या न म्हणता गोविंद घ्या, दामोदर घ्या अशी म्हणू लागली. हे ऐकून मथुरेच्या इतर नारी तिला हसू लागतात. कारण त्या गवळणीच्या तादात्म्य परिस्थितीचे आकलन मथुरेच्या गवळणीला होत नसते. गोकुळची गवळण पूर्णपणे संसाराला विसरून जाते. गोरस घ्या असे म्हणण्याऐवजी ती गोपी गोविंद घ्या असे म्हणू लागते उलट हसणाऱ्या गोपीला ती म्हणते, गोविंद आणि गोरस ती एकाचीच नावे आहेत तो गोरस घेऊन मी तुमच्या गावी आले आहे. अशा तऱ्हेने श्रीकृष्णाच्या म्हणजे विठ्ठलाच्या भेटीने ती गवळण श्रीकृष्णाशी तद्रूप झाली आहे. असे ज्ञानदेवाने गोपीचे

मानसचित्र रेखाटले आहे. एका गीतात ही गोपी स्वतःला धन्य समजते व तिचा संसार सुखी झाला आहे. तिच्या दृष्टीने तिन्ही लोकांत आनंद भरून उरला आहे. कारण तिच्या दृष्टीने माहेर हे पंढरी आहे व माहेरी सदा सर्वकाळ आनंदच असतो. त्याप्रमाणेच पंढरीत तिला सर्वत्र आनंदाची अनुभूती येते. पांडुरंगाच्या या भेटीत तिला स्वविसर पडलेला आहे. स्त्रियांच्या दृष्टीने माहेर हे जसे आनंदाचे कौतुकाचे स्थान आहे. त्याचप्रमाणे संताच्या दृष्टीने पंढरीचे क्षेत्र आनंदाचे माहेर आहे. म्हणूनच पंढरीत जाताना या गोपीचा आनंद द्विगुणीत होतो ती सख्यांना म्हणते, "जाईन गे माय पंढरपुरा भेटेन माहेरा आपुलिया" या शब्दात ज्ञानदेव भक्ती सुखाचा आनंद व्यक्त करतात. संताच्या गवळणीत श्रीकृष्ण व विठ्ठल यात फरक केलेला नाही. गोकुळ येथील सुख व पंढरीतील सुख संतांना एकसारखे वाटते. म्हणूनच एका गीतात एका सखीला साजणीला जाणवते की विठ्ठल हा किती गोड आहे सुंदर आहे पूर्वजन्मीची पुण्याई म्हणूनच तो आवडता विठ्ठल आम्हाला भेटला. आता या जगात विठ्ठला वाचून कोणताही आनंद नाही. कारण सर्व प्रकारचे सुख या विठ्ठलाच्या रूपात व गुणात साठवले आहे म्हणून वारंवार ती गोपी विठ्ठलाच्या प्रेमाची आवड व्यक्त करते, "तोहा विठ्ठल बरवा, तोहा माधव बरवा" हा ज्ञानदेवांचा खास आवडीचा शब्द आहे. डोळे, कान, जीव्हा, त्वचा या सर्वच इंद्रियाने मधुर व आनंददायक वाटणारा विठ्ठल एका बरवा शब्दात ज्ञानदेवांनी व्यक्त केला आहे. ज्ञानदेवांचे अभंग म्हणजे अपार्थिवाचे गाणे होय. त्यांच्या गवळणी, विरहिणी यात कोणताही प्रापंचिक, संसारिक अनुभव व्यक्त केला नाही किंवा व्यक्तिगत, शारीरिक, मानसिक अनुभवाचे दर्शन अभंगात आढळत नाही किंवा समाजाचे व व्यक्तीचे दुर्गुण छळ अशा अनुभवांनाही ज्ञानदेवांच्या कवितेत स्थान नाही, ज्ञानदेवांचे अभंग म्हणजे चैतन्याचे गाणे आहेत. एखाद्या अनेक रंगी कारंजाप्रमाणे ही अनुभूती विविध संवेदनाच्या माध्यमातून ज्ञानदेव व्यक्त करतात. त्या रंग गंध संवेदना, रूप संवेदना, स्पर्श संवेदनावरच संवेदना ज्ञानदेवांच्या अभंगातील परमात्मा रूपाचे वर्णन म्हणजे सखोल चिंतन असते. एक तत्व या दृष्टीने ज्ञानदेव परमात्म्याला पाहतात. परमात्मा सगुण आणि निर्गुण या दोन्हींच्याही पलीकडे आहे. तो ब्रह्मरूप व सनातन आनंद रूप आहे. तोच विठ्ठलाच्या रूपाने विटेवर उभा आहे. त्याचे ध्यान करता, करता ज्ञानदेवाचे चित्त निरंजन अवस्थेत गेले आहे. ध्येय ध्यानधारणा या त्रिपुटीच्या पलीकडे गेले आहे. अशा तऱ्हेने ज्ञानदेवांना विठ्ठल म्हणजे केवळ मुक्ती नसून ती तत्त्वानुभूती आहे. एका अभंगात ज्ञानदेवाने देवाला उद्देशूनच लाडिवाळपणे विचारले आहे, "तुज सगुण म्हणू की] निर्गुण रे, सगुण निर्गुण एक गोविंदु रे" हे विठ्ठला तुला काय म्हणावे? हेच समजत नाही तसे पाहिले तर प्रत्यक्ष श्रुती यांना देखील तुझ्या स्वरूपाचे नेमके वर्णन करता आले नाही इतका तू निराळा आहे तुला सगुण म्हणावे तर तू निर्गुण आहेस किंवा स्थूल म्हणावे तर सूक्ष्मही आहेस तुला आकार आहे तसाच तू निराकारही आहेस, तू मूर्तीच्या रूपाने दृश्य आहेस पण तात्विक दृष्टीने अदृश्य आहेस. परमात्मा स्वरूप कसे परस्पर विरोधी आहे. तरी पण एकच परमात्मा सगुण, निर्गुण, साकार, आकार, दृश्य, अदृश्य ज्ञानदेवाला अनुभवायला मिळतो. ते खरे म्हणजे निवृत्तीनाथाच्या प्रसादाने ज्ञानदेवाला मिळाले. निवृत्तीनाथ ज्ञानदेवाचे कौतुक करतात. अरे ज्ञाना तू खरोखर पावन झालास. कारण तुला तुझे स्वरूप कळाले. तुला भक्तीने देव कळला. आता तुझ्या ठिकाणी ज्ञानही आहे, अज्ञानही नाही. तू वृत्ती आणि निवृत्ती यापलीकडे गेलास. शांती, क्षमा, दया हे दैवी गुण तुझ्या ठिकाणी प्रगट झाले. अशा शब्दात निवृत्तीनाथांनी ज्ञानदेवांचे कौतुक केले. या कौतुकातही ज्ञानदेवांच्या अनुभवाचे तेज प्रकट झाले आहे. परमेश्वराचे स्वरूप सहजासहजी कळणे अवघड आहे. कारण तो सर्वांच्या अंतरंगात आहे. लहान मोठा असा त्यात फरक नाही म्हणून परमेश्वर स्वरूप स्थूल बुद्धीच्या माणसास कळणे शक्य नाही. ज्याप्रमाणे फुलातल्या सुगंधाचे गुंफण दोऱ्यात करता येत नाही किंवा मोत्यांच्या पाण्याने रांजण भरता येत नाही किंवा आकाशाला गवसणी घालता येत नाही तसेच साखरपाकाकडून त्यातील गोडी वेगळी करता येत नाही किंवा धावणार्याचा पदर धरता येत नाही त्याप्रमाणे परमेश्वराचे स्वरूप स्थूल बुद्धीने कळत नसते. हा भाव ज्ञानदेवांनी व्यक्त केला.

परमेश्वराच्या साक्षात्काराने आनंदाच्या अनुभवाचे अनेक नाचरे उद्रेक ज्ञानदेवांच्या कवितेत आढळतात. कधीकधी तर त्या अमृताच्या वर्षावात ज्ञानदेवाचे अभंग पुलकित होतात. असा दिवस ज्ञानदेवांना सोन्याचा दिवस वाटतो. अंतरबाह्य हरीलाच पावतो. संताच्या संगतीत हरी अंगात मुरला आहे या कल्पनेने ज्ञानदेवाचे मन शहारुन येते व ते उद्गारतात, "हरी पाहिला रे। हरी पाहिला रे सबाहयभ्यांतरी।

अवघा व्यापक मुरारी ।" संतांच्या संगतीत नुसतेच भजन नसते तर संतांच्या भक्तीतील भुललेला देवही प्रकट होतो. हाच ज्ञानदेवांच्या दृष्टीने अतिशय अल्हाददायी क्षण असतो. त्याच क्षणी त्यांना ब्रह्मानंद होतो. लोकांना उद्देशून ते म्हणतात, या हरीला पहा त्याचे ध्यान करा वाणीने त्याचे गुणगान करा त्याच्या भजनात नाचा तोच या जगाचा आधी व अंती आहे. अशा शब्दात ज्ञानेश्वरांनी हा आनंद व्यक्त केला आहे. एका गीतातून मोगर्याच्या वेलीच्या रूपकातून आत्मानुभवाचे चित्रण केले आहे. शरीरातील सुक्ष्म आत्मतत्व पण त्याचा अनुभव येताच तो अनुभव केवळ शरीर आणि मन यापुरताच मर्यादित राहील. पण एखादे मोगर्याचे छोटेसे रोप दारात लावले आणि पाहता पाहता तो वेल आकाशात भरभरून पसरावा आणि या वेलीस असंख्य फुले फुलावीत. जसजशी फुलांची वेचनी तसा तसा या वेलीच्या कळयांना अधिकच बहार येतो. असा ज्ञानदेवाचा अनुभव सर्वदूर पसरला आहे. त्यात सत्य,शिव, सौंदर्य आहे वेलीच्या रूपकातून कवी वर्णन करतो, "मोगरा फुलला मोगरा फुलला,। फुले वेचीता अतिभारू कळीयासी आला.।।" फुलांच्या भाराने व कळयाच्या ओझ्याने वाकलेली ही वेल म्हणजे आत्मानुभवाची एक सुंदर प्रतिमा आहे. आत्मानुभव ही केवळ कल्पना नाही तर ती सर्वसंवेदनांना आवाहन करणारी एक सुंदर कल्पना आहे. याची प्रचिती या गितातून येते. या फुलांनी ज्ञानदेवांच्या अनुभूतीला केवळ सुंदर बनवते. नाही तर त्या अनुभवात सर्व समर्पणशीलता आहे. ते त्यात ही सर्वफुले गुंफून ज्ञानदेवांनी एक सुंदर शेला विणला आहे आणि तोही आवडत्या विठ्ठलास अर्पण केला आहे. अशा प्रकारच्या रचनेस साहित्यशास्त्रात रूपकाशयोक्ती म्हणतात. या गीतात मोजके रूपांतर आहेच. पण या रूपकात अतिशयोक्तीच्याही छटा मिसळल्या आहेत. मन हे एखाद्या भुंग्याप्रमाणे सदैव भ्रमण करत असते. त्या मनाला उद्देशून म्हणजेच मनरूपी भ्रमराला उद्देशून एक गीत गायले आहे. त्या भ्रमरास अवगूण टाकून श्री विठ्ठलाच्या चरणकमलातील सुगंधाचे सेवन करावे. तेच हे भाग्य आहे. तोच खरा आनंद आहे. असे मनाला बजावतात. परमेश्वर भक्तीतील तल्लीनता या गितात आढळते. मनावर भ्रमराचे रूपक भावनिक आहे. ज्ञानदेवांच्या कवितेत अतिशय सुंदर प्रतिमा येतात. ते सर्व चर्चेवरून दिसून येते. गवळणी व विरहीणी या देखील प्रतिमाच आहे. प्रत्येक गवळणी एक स्त्रीची प्रतिमा कवी चित्रित करतो. एक भावमग्न स्त्री प्रत्येक गवळणीत पाहायला मिळते. आपल्याच अनुभवाचे चिंतन करणारी स्त्रीची प्रतिमा गितात आढळते. ही राजविलासी आहे तिच्याभोवती सूंदर सुंदर भोग आहेत. पण भोगापासून तिला आनंद वाटतो. कारण तिचे मन श्रीकृष्णाशी एकरूप झाले आहे. कृष्णाच्या भेटीसाठी आतूर झालेली काऊला साद घालते. अशा विविध हळव्या स्त्री प्रतिमा ज्ञानदेवाच्या गितात येतात. कांही गितात आनंद, धुंद स्त्रीप्रतिमा आहे. दृष्टांताचा वापर करून कवीने केले आहे. परमेश्वराचे स्वरूप सहजासहजी कळणे शक्य नाही. हे कथन केलेले आहे. मोत्याचे पाणी, कापुराचे कांडण, साखरेला पकडणे,फुलांचा सुगंध गुंफणे मलयगीरीचा वारा गाळणे, डोळयातील बाहुली वेगळी करणे, हे दृष्टांत योजून कवीने परमात्मतत्व सहजासहजी आकलन होत नसते. हे दाखवून दिले. निदर्शने या अलंकाराचा कवीने येथे कुशलतेने वापर केला आहे. मोगर्याचे वेलीचे फुल भ्रमराचे रूपक यातून आत्मानंदाची धुंदी लयबध्द शब्दात ज्ञानदेवांनी गायीली आहे. सोनियाचा दिनु ,अमृताचा धनु अशा रूपकातून कवीने आनंदाने शब्दांकीत करतो. ज्ञानदेवाची गीते ही एक प्रकारची पदरचना आहे. ती गायील्यामुळे त्यातील भाव अधिक सुंदर होतो. जसे रूणुझुणू रे भ्रमरा,आजि सोनियाचा दिनु हे अभंग नसून पदे आहेत. संतांनी अभंगानाच पदांचे रूप देऊन आपला अनुभव व्यक्त केला आहे. ज्ञानेश्वरांच्या कांही अभंगाच्या शेवटी बापरखुमादेवीवरू अशी नाममुद्रा आढळते. एरव्ही ज्ञानदेवांनी अभंगात ज्ञानेश्वरीत ज्ञानदेव म्हणे, निवृत्तीदास म्हणे अशी नाममुद्रा वापरली पण बर्याच अभंगात ज्ञानदेवांनी बापरखुमादेवीवरू अशी नाममुद्रा वापरली दिसते. याचे रहस्य काय बापरखुमादेवीवरू याचा शब्दश: अर्थ रखुमादेवीचा वर म्हणजेच पती विठ्ठल असा होतो. ज्ञानदेवांच्या वडिलांचे नाव,विठ्ठल, आईचे नाव रूक्मिणी असे होते. ज्ञानदेवांच्या लहानपणीच आईवडीलांनी देहत्याग केला. या घटनेचे तीव्र शल्य ज्ञानदेवांसारख्या कवीच्या अंतरंगात कुठेतरी बोचत असावे. आपल्या आईवडीलांची स्मृती आपल्या काळात असावी. या हेतुने ज्ञानदेवांनी बर्याच अभंगाच्या शेवटी बापरखुमादेवीवरू अशी नाममुद्रा योजिली आहे. एका अर्थाने आपल्या आईवडिलांचे स्मृतीचे महत्व ज्ञानदेवांनी या नाममुद्रेत कायमचे साठवले आहे.

**संदर्भग्रंथ :-**

१) (संपा.) ब्रम्हीभूत श्री रामचंद्र महाराज यादव, 'श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या सार्थ अभंगाची सार्थ गाथा', श्री ज्ञानदेव सदन कोल्हापूर, कार्तिक शु.एकादशी १९३९

२) यशवंत साधु, 'गवाक्ष', रजत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९८

३) यशवंत साधु, 'मंथन', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २००२

४) (संपा.) विद्यासागर पाटंगणकर, 'निवडक अभंग ज्ञानेश्वर ते तुकाराम', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०००

५) (संपा.) दादा गोरे, 'अभंगवाणी', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती १९९८